सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,भंडारा,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

दुरध्वनी क्र.01784-251222 E-Mail- ddmobnd@gmail.com

**वाचा :** १ आपत्ती व्यवस्थापनकायदा, २००५ चे कलम३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना२०२०/प्रा.क्र.५८/ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

३. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा. मुख्य सचिव यांचे दुरचित्रवाणी परिषदेत दिलेले निर्देश दि.१६ मार्च २०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**
**क्र.कक्ष/जिकाभं/जि.आ.व्य.अ./**३५**/२०२०**
**दिनांक :-**२३**/०३/२०२०**

## आदेश

राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून स्वातंत्र्यरित्या निर्गमित करण्यात येत आहे. तसेच सदर्भ क्र. ०२ मधील परिच्छेद ०३ नुसार कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणने व प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहे.

सदर कायदा भंडारा जिल्ह्यात लागु करण्यात येत असुन करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्ह्यातील नागरीकांमध्ये करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजनेचा एक भाग म्हणून मी एम. जे. प्रदीप चंद्रन, जिल्हाधिकारी भंडारा खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

1. भंडारा जिल्ह्यास लागून असलेली आंतर्राज्यीय (म.प्र.) सिमा तात्काळ बंद करण्यात येत आहेत. (अत्यावश्यक सेवा, किराणा माल, भाजीपाला, दुध, औषधे व स्वास्थ सेवासंबंधी वाहने वगळुन)
2. पुणे, मुंबई, नागपूर व इतर महानगरातुन जिल्ह्यात आलेल्या व्यक्तींना वैद्यकिय कारणाशिवाय घराबाहेर पडण्यास मनाई करीत आहे.
3. भंडारा जिल्ह्यात ईतर जिल्ह्यातून येणारी सर्व वाहतूक तात्काळ बंद करण्यात येत आहे. (मालवाहतुक, अत्यावश्यक सेवा, किराणा माल, भाजीपाला, दुध, औषधे व स्वास्थ सेवासंबंधी वाहने वगळुन)

सदरील आदेश दिनांक 23/3/2020 ते दिनांक 31/3/2020 पर्यंत अंमलात राहतील. आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणतीही व्यक्ती, संस्था, अथवा समुह आपत्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 अन्वये आणि भारतीय दंड सहिंता 1860 मधील कलम 188 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कार्यवाही करण्यात येईल.

Pradip

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,भंडारा**
**जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा**

**प्रती** -१. सर्व विभाग प्रमुख ------------------------------------------------------------------- जिल्हा भंडारा

**प्रत**-१.मा. विभागीयआयुक्त, नागपुर विभाग नागपुर यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे माहितीस्तव सविनंय सादर.

Scanned by CamScanner